नि.फौ.ख.क्र.१२६/२०१९
सरकार वि.धनराज
नि.क्र.१९

साक्षीदार क्र **०२** ची सरतपासणी
देवाची शपथ खरे सांगतो
नाव :–चेतन राजेंद्र तळवेकर,
वय:–२८ वर्ष, व्यवसाय–कृषी केंद्र,
राह.बेला, ता.उमरेड, जि.नागपूर.

**सरतपासणी सरकारी वकील श्री.व्ही.यु.मिरचे यांच्या मार्फत**

१. मी आरोपीला ओळखत नाही. घटनेबाबत मला काही माहित नाही. पोलिसांनी चौकशी करून माझे बयाण नोंदविले होते.

**सदर साक्षीदार अभियोग पक्षास कोणत्याही मुद्द्यावर सहकार्य करीत नसल्याने त्यास उत्तरसुचक प्रश्न विचारण्याची परवानगी मागितली असता, परवानगी देण्यात येते.**

२. हे म्हणणे खरे आहे की, दि.१८.०५.२०१९ रोजी सायंकाळी ५.०० वाजेच्या दरम्यान मी व राहुल कांबडे याच्या मो.सा.वर बसुन मोहन पोळकेच्या घरासमोरून रोडने बेला बाजारात जात होतो, त्यावेळी पिपरा येथे राहणारा शुभम बढीये हा मोहन पोळके याच्या घरासमोर रक्तबंबाळ होऊन पडुन दिसल्याने त्याला उपचाराकरिता मी व राहुल कांबळे असे सायकलवर मधात बसुन सरकारी दवाखाना बेला येथे नेले होते. हे म्हणणे खरे नाही की, त्यावेळी जखमी शुभम याने मला सांगितले होते की, आरोपी धनराज यांनी मला पकडुन ठेवले व आरोपी फकिरा याने माझ्या डोक्यावर व खांद्यावर लोखंडी रॉडने मारले व आकाश ढोके याने त्याच्या हातातील चाकुने माझ्या डाव्या हातावर, कंबरेवर व कंबरेखाली चाकुने वार करून पळून गेला. हे म्हणणे खरे आहे की, त्यावेळी जखमीचे वडील व त्याचा लहाण भाउ दवाखाण्यात आले होते. याव्यतिरिक्त मला काही माहिती नाही. आता मला माझ्या बयाणातील **अधोरेखांकित भाग अ** वाचुन दाखविण्यात आला तो पोलिसांनी माझ्या सांगण्याप्रमाणे लिहीलेला नाही. हे म्हणणे खरे नाही की, मी आजरोजी खोटी साक्ष देत आहे.

**सरतपास संपला.**

**आरोपीतर्फे नि.क्र.१८ प्रमाणे उलटतपास पुढील तारखेपर्यंत तहकूब करण्यात**

<u>आला.</u>

<u>फेरतपास काही नाही.</u>

वा.दा.ब.अ.सा. समक्ष

(आर.एस.मानकर)
न्यायदंडाधिकारी प्रथम श्रेणी, उमरेड
दि.०२.०५.२०२६

(आर.एस.मानकर)
न्यायदंडाधिकारी प्रथम श्रेणी,
उमरेड